पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १६८। किंमत - ५ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार १२/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# दुर्गाताई तांबे यांचा आमदार खताळ यांच्यावर जोरदार प्रतिहल्ला

## माझ्या रक्तात लोकशाहीचा आदर आहे; विधिमंडळ कालही पवित्र होते, आजही आहे आणि उद्याही राहील

**संगमनेर (युवावार्ता) प्रतिनिधी**

संगमनेरच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या मालिकेला आता थेट महाराष्ट्र विधानसभेचे पडसाद उमटले आहेत. संगमनेर नगरपरिषदेच्या संदर्भातील मुद्द्यावरून विधानसभेत आमदार अमोल खताळ यांनी माजी नगराध्यक्षा दुर्गाताई (अंजली) तांबे यांच्याविरोधात हक्कभंगाची कारवाई करण्याची मागणी केल्यानंतर या वादाने अधिकच तीव्र स्वरूप धारण केले आहे. त्यानंतर दुर्गाताई तांबे यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या सविस्तर निवेदनातून आपण कधीही महाराष्ट्र विधानसभेचा अवमान केलेला नसल्याचे स्पष्ट करत, लोकशाहीवरील आपल्या निष्ठेची आणि संसदीय परंपरेवरील श्रद्धेची ठाम भूमिका मांडली आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे संगमनेरच्या राजकारणात पुन्हा एकदा खताळ विरुद्ध तांबे-थोरात असा संघर्ष रंगला असून, या वादाची चर्चा आता केवळ मतदारसंघापुरती मर्यादित न राहता राज्याच्या राजकीय वर्तुळातही सुरू झाली आहे.

**नेमके विधानसभेत काय घडले?**

विधानसभेत बोलताना आमदार अमोल खताळ यांनी सभागृहाच्या निदर्शनास हा विषय आणत म्हटले की, संगमनेर नगरपरिषदेच्या लक्षवेधीवरून प्रतिक्रिया देताना दुर्गाताई तांबे यांनी एका इलेक्ट्रॉनिक माध्यमाशी बोलताना महाराष्ट्र विधानसभेचा उल्लेख अपवित्र विधानसभा असा केल्याचा आरोप आहे. हे वक्तव्य केवळ एखाद्या आमदाराचा किंवा राजकीय पक्षाचा अपमान नसून संपूर्ण महाराष्ट्र विधानसभेच्या संस्थात्मक प्रतिष्ठेवर आघात करणारे असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार खताळ यांनी विधानसभेत स्पष्ट शब्दांत म्हटले की, महाराष्ट्र विधानसभेत जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी बसतात, कायदे तयार होतात, शासनाला उत्तरदायी धरण्याचे घटनात्मक कार्य केले जाते. अशा सर्वोच्च लोकशाही संस्थेला अपवित्र म्हणणे म्हणजे कोट्यवधी मतदारांच्या जनादेशाचाच अवमान आहे. लोकशाहीत मतभेद असू शकतात, सरकारवर टीका होऊ शकते; मात्र संपूर्ण विधानसभेची प्रतिष्ठाच कमी करणारी भाषा कोणालाही मान्य होऊ शकत नाही, असे त्यांनी नमूद केले.

यापुढे अशा प्रकारच्या विधानांना आळा बसावा, तसेच लोकशाही संस्थांबद्दल चुकीचा संदेश समाजात जाऊ नये, यासाठी संबंधितांवर हक्कभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली.

**सोशल मीडियावरून दुर्गाताईंचे सविस्तर स्पष्टीकरण**

आमदार खताळ यांच्या आरोपांनंतर काही तासांतच दुर्गाताई तांबे यांनी सोशल मीडियावर मोठे निवेदन प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी सर्वप्रथम महाराष्ट्राच्या लोकशाही व्यवस्थेबद्दल आणि विधिमंडळाबद्दल आपला नितांत आदर असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी म्हटले की, मी भारतीय लोकशाहीचा मनापासून आदर करते. लोकशाहीचे पवित्र




### आमच्या चार पिढ्यांनी विधिमंडळाची प्रतिष्ठा जपली

### राजकारणासाठी प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न - दुर्गाताई तांबे

मंदिर असलेल्या आपल्या विधिमंडळाबद्दल माझ्या मनात नेहमीच नितांत आदर राहिला आहे आणि तो आयुष्यभर राहील. आपण स्वतः तब्बल साडेबारा वर्षे संगमनेर शहराच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा म्हणून काम केले असून, सभागृह चालविण्याचा अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे सभागृहाची प्रतिष्ठा, त्याच्या परंपरा आणि लोकशाही मूल्ये काय असतात याची पूर्ण जाणीव असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**'चार पिढ्यांची लोकशाहीची परंपरा'**

आपल्या कुटुंबाच्या राजकीय आणि सामाजिक वारशाचा उल्लेख करत दुर्गाताई तांबे यांनी सांगितले की त्या स्वातंत्र्यसैनिक स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांच्या कन्या आहेत. स्वातंत्र्य चळवळ, सहकार आणि लोकशाही मूल्यांसाठी आयुष्यभर झटलेल्या कुटुंबातून आपण आलो असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे लिहिले की, त्यांचे वडील विधानसभेचे सदस्य होते. बाळासाहेब थोरात यांनी जवळपास चार दशके महाराष्ट्र विधानसभेत जनतेचे प्रश्न मांडले. त्यांचे पती डॉ. सुधीर तांबे यांनी विधानपरिषदेत दीर्घकाळ काम केले, तर त्यांचे पुत्र सत्यजीत तांबे सध्या विधिमंडळात जनतेचे प्रतिनिधित्व करत आहेत. ज्या कुटुंबातील चार पिढ्यांनी लोकशाहीवर श्रद्धा ठेवली, त्या कुटुंबातील व्यक्ती विधिमंडळाचा अपमान करेल, असा आरोप करणे अत्यंत वेदनादायी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**'संस्कारांवर प्रश्न उपस्थित करणे दुर्दैवी'**

दुर्गाताई तांबे यांनी आपल्या निवेदनात नाव न घेता आमदार खताळ यांच्या भूमिकेवरही टीका केली. त्यांनी म्हटले की, राजकीय विरोध असू शकतो, विचारभिन्नता असू शकते; मात्र त्यासाठी एखाद्याच्या संस्कारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य नाही. राजकारणासाठी एवढ्या खालच्या पातळीवर जाऊन एखाद्याच्या संस्कारांवर प्रश्न उपस्थित करणे अत्यंत दुर्दैवी आहे. विरोध करा, टीका करा, विचारांची लढाई लढा; पण खोटा अर्थ काढून जाणीवपूर्वक गैरसमज पसरवणे ही लोकशाहीची परंपरा नाही, असे त्यांनी म्हटले.

**'माझ्या रक्तात लोकशाहीचा आदर आहे'**

आपल्या निवेदनाचा शेवट अत्यंत भावनिक शब्दांत करत त्यांनी म्हटले, माझ्या रक्तात लोकशाहीचा आदर आहे. माझ्या संस्कारात संसदीय सभागृहांचा सन्मान आहे आणि माझ्या आयुष्यात लोकसेवेचीच वाट आहे. विधिमंडळ माझ्यासाठी कालही पवित्र होते, आजही पवित्र आहे आणि उद्याही पवित्रच राहील. तसेच, बाकी कसलेही भान नसलेल्या टीका करणाऱ्यांना मी उत्तर देणार नाही, असे म्हणत त्यांनी या विषयावर आपली भूमिका स्पष्ट केल्याचे सांगितले.

**राजकीय वातावरण तापले**

या संपूर्ण प्रकरणामुळे संगमनेरच्या राजकारणात पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपांचा जोर वाढला आहे. एका बाजूला आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत हक्कभंगाची मागणी करत हा विषय राज्याच्या पटलावर नेला, तर दुसऱ्या बाजूला दुर्गाताई तांबे यांनी आपल्या कुटुंबाच्या चार पिढ्यांच्या लोकशाही परंपरेचा दाखला देत आपण विधिमंडळाचा अवमान केला नसल्याचा ठाम दावा केला आहे.

# आ. अमोल खताळ यांची विधानसभेत आक्रमक भूमिका

### माजी नगराध्यक्षा अंजली तांबे यांच्याविरोधात हक्कभंगाची मागणी

### प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठविण्याची अध्यक्षांची सूचना




संगमनेर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा अंजली सुधीर तांबे यांनी माध्यमांशी बोलताना महाराष्ट्र विधानसभेचा उल्लेख अपवित्र विधानसभा असा केल्याचा मुद्दा राज्य विधानसभेत गाजला. या वक्तव्याची गंभीर दखल घेत आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत हा विषय काल उपस्थित केला. संबंधितांविरुद्ध हक्कभंगाची कारवाई करून हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठविण्यात यावे, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठवले.

**विधानसभेच्या प्रतिष्ठेवर आघात - आ. खताळ**

आमदार खताळ यांनी सभागृहात मांडलेल्या निवेदनात म्हटले की, हे वक्तव्य केवळ एखाद्या सदस्याविरुद्ध किंवा विशिष्ट राजकीय पक्षाविरुद्ध नसून संपूर्ण महाराष्ट्र विधानसभेच्या संस्थात्मक प्रतिष्ठेवर आघात करणारे आहे. महाराष्ट्र विधानसभा ही राज्यातील जनतेने लोकशाही पद्धतीने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचे सर्वोच्च व्यासपीठ असून, याच सभागृहात जनतेचे प्रश्न मांडले जातात, कायदे तयार केले जातात आणि शासनाला उत्तरदायी धरण्याचे घटनात्मक कार्य पार पाडले जाते.

**जनादेशाचाही अवमान - आ. खताळ**

त्यामुळे अशा लोकशाही संस्थेला अपवित्र संबोधणे म्हणजे केवळ सभागृहाचाच नव्हे, तर महाराष्ट्रातील कोट्यवधी मतदारांच्या जनादेशाचाही अवमान असल्याचे आमदार खताळ यांनी नमूद केले. लोकशाही व्यवस्थेत मतभेद आणि टीका स्वाभाविक असली, तरी त्यासाठी संपूर्ण विधानसभेची प्रतिष्ठा धुळीस मिळेल, अशी भाषा वापरणे कोणत्याही परिस्थितीत योग्य ठरू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**गंभीर परिणामांची व्यक्त केली चिंता**

विधानसभेबाबत अवमानकारक शब्दांचा वापर करण्यात आल्याचा आरोप करत, अशा प्रकारच्या विधानांकडे दुर्लक्ष झाल्यास भविष्यात इतरांनाही विधानसभेबाबत अवमानकारक भाषा वापरण्यास प्रोत्साहन मिळू शकते, अशी चिंता आमदार खताळ यांनी व्यक्त केली. विधानसभेतील प्रत्येक सदस्याचे कर्तव्य म्हणजे सभागृहाची प्रतिष्ठा, अधिकार आणि परंपरा अबाधित राखणे होय. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ राजकीय वाद म्हणून न पाहता, विधानसभेच्या विशेषाधिकार आणि सन्मानाच्या दृष्टीने गांभीर्याने पाहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले.

**विशेषाधिकार समितीकडे पाठविण्याची मागणी**

आमदार अमोल खताळ यांनी विधानसभा अध्यक्षांकडे संबंधित प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची विनंती केली. संबंधितांविरुद्ध हक्कभंगाची कार्यवाही सुरू करून हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठविण्यात यावे, तसेच आवश्यक चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी, जेणेकरून महाराष्ट्र विधानसभेची प्रतिष्ठा आणि लोकशाही संस्थांबद्दलचा जनतेचा विश्वास कायम राहील, अशी मागणी त्यांनी केली.

ॲडव्हान्स गोल्ड एस.आय.पी. योजना
२०२६-२७
आजची छोटी बचत... उद्याची मोठी सोन्याची खरेदी!
आताच गोल्ड एस.आय.पी. सुरु करा आणि २०२७ च्या अक्षयतृतीयेला आपल्या आवडीचे दागिने घरी न्या.
: उपलब्ध योजना :
मजुरी फ्री / एक्स्ट्रा बोनस एस.आय.पी.
फिक्स भाव बुकिंग एस.आय.पी.
फ्लेक्सिबल भाव बुकिंग एस.आय.पी.
SIP ऑनलाईन सुविधा उपलब्ध.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
ओम मयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# राज्यात जोरदार पावसाचा इशारा

राज्यात यंदा मान्सून उशिरा दाखल झाला असला, तरी गेल्या काही दिवसांतील धुव्वाधार पावसाने सर्व कसर भरून काढली आहे. सध्यातरी राज्यातील अनेक भागांत पावसाने विश्रांती घेतली असून ऊन-सावल्यांचा खेळ सुरू आहे. मात्र, असे असले तरी भारतीय हवामान विभागाने आज विदर्भासाठी पावसाचा महत्त्वाचा इशारा दिला आहे. दुसरीकडे, पावसामुळे राज्यातील प्रमुख धरणांच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली असून मुंबईकरांसह बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे.

यंदा 'एल-निनो'च्या प्रभावामुळे देशात पावसाचे प्रमाण कमी राहील आणि दुष्काळी परिस्थिती निर्माण होईल, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी वर्तवला होता. मात्र, हा अंदाज फोल ठरवत संपूर्ण देशात मान्सून जोरदार सक्रिय झाला आहे. महाराष्ट्रात सध्या पावसाचा जोर काहीसा ओसरला असला, तरी हवामान विभागाच्या माहितीनुसार पुढच्या आठवड्यापासून राज्यात पुन्हा एकदा पावसाची दमदार बॅटिंग पाहायला मिळण्याची शक्यता आहे. आज विशेषतः विदर्भात पावसाला पोषक वातावरण तयार झाले असून तिथे विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्याच्या उर्वरित भागात मात्र काही अंशीच पाऊस कोसळेल.दोन-तीन दिवसांपूर्वी इगतपुरी आणि नाशिक परिसरातील धरण क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे प्रमुख धरणांच्या पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणारे वैतरणा धरणही आता ५० टक्क्यांवर पोहोचले आहे. दोन-तीन दिवसांपूर्वी इगतपुरी आणि नाशिक परिसरातील धरण क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे प्रमुख धरणांच्या पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणारे वैतरणा धरणही आता ५० टक्क्यांवर पोहोचले आहे.

# शेतकऱ्यांना मोठा दिलासा; कर्जमाफीच्या अटी शिथिल

मुंबई (वृत्तसंस्था)

सरकारने महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी योजनेतील अटींमध्ये बदल केला आहे. २०१९ च्या कर्जमाफी योजनेतील पात्र शेतकऱ्यांना आता २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच प्रोत्साहन योजनेत २०२६-२७ या आर्थिक वर्षात कर्जफेड केलेली असावी ही अटही रद्द करण्यात आली आहे. मागील कोणत्याही दोन वर्षांत कर्जाची परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. विरोधकांच्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी हा निर्णय जाहीर केला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना आजवरची सर्वात मोठी असल्याचा दावा त्यांनी केला.कोणाला किती फायदा?सरकारच्या निर्णयामुळे महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी योजनेतील पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे. या निर्णयामुळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांना सुमारे १२ ते १३ हजार कोटी रुपयांचा लाभ होईल. विरोधकांनी ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याचा आरोप केला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, सरकारने ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार कोटी रुपयांचा लाभ देणारी ऐतिहासिक योजना जाहीर केली आहे.हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून नागपुरात राज्य



विधिमंडळाच्या तीन आठवडे चाललेल्या पावसाळी अधिवेशनाची शुक्रवारी सांगता झाली. आता राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणार असल्याची घोषणा करण्यात आली. शेतीसाठी भरघोस निधीवीजमाफीसाठी दरवर्षी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कृषी विभागाच्या विविध योजना आणि अनुदानांद्वारे शेतकऱ्यांना सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा लाभ दिला जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कुठेही लोडशेडिंग नाहीराज्यात कुठेही लोडशेडिंग नाही, असेही मुख्यमंत्री म्हणाले. वाढीव वीज बिलाबाबत स्मार्ट मीटरचा संबंध नाही. स्मार्ट वीज मीटरबाबत तपासणीनंतर केवळ २१० तक्रारीत तथ्य आढळले, असेही त्यांनी सांगितले. धान बोनसही लवकरचधान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस देण्याबाबत सरकार सकारात्मक असून योग्य वेळी निर्णय घेतला जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# राष्ट्रगीत-राष्ट्रगान सादरीकरणासाठी गृह मंत्रालयाचे कडक नियम

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्रीत गृह मंत्रालयाने राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान गायनासंदर्भात सर्व राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रालयांना नवीन व कडक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या नव्या निर्देशांनुसार, राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान गाताना किंवा वाजवताना त्यांचे नियम, योग्य क्रम, अचूक शब्द आणि स्पष्ट उच्चार यांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य करण्यात आले आहे.गृह मंत्रालयाने ९ जुलै २०२६ रोजी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना आणि केंद्र सरकारच्या विविध विभागांच्या सचिवांना पत्र लिहून या आदेशांची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.



या नवीन नियमांनुसार, ज्या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान हे दोन्ही सादर केले जाणार आहेत, तिथे एक निश्चित क्रम पाळणे आवश्यक आहे. कार्यक्रमांमध्ये सर्वात आधी राष्ट्रगीत गायले किंवा वाजवले जाईल आणि त्यानंतरच राष्ट्रगान सादर केले जाईल. याशिवाय, ज्या राज्यांचे स्वतःचे राज्यगीत (उदा. महाराष्ट्राचे 'जय जय महाराष्ट्र माझा) आहे तिथे राज्यगीत देखील राष्ट्रगीत आणि राष्ट्रगानाच्या नियमांनुसारच सादर केले जाईल. अशा वेळीही राष्ट्रगीत आधी आणि त्यानंतर राष्ट्रगान वाजवण्याचा क्रम कायम राहील, असे गृह मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. गृह मंत्रालयाने राष्ट्रगीत आणि राष्ट्रगानाच्या सादरीकरणादरम्यान होणाऱ्या उच्चारांच्या चुकांवर गंभीरपणे बोट ठेवले आहे. हे दोन्ही राष्ट्रीय सन्मान सादर करताना त्यांचे अचूक शब्द, मूळ भाषा आणि योग्य उच्चार याकडे विशेष लक्ष देण्यास सांगण्यात आले आहे. नागरिकांना आणि संस्थांना याचे नियम समजणे सोपे जावे म्हणून राष्ट्रगीत आणि राष्ट्रगानाचा अधिकृत पाठ आणि त्यांचे योग्य उच्चार गृह मंत्रालयाच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या आदेशाची प्रत राष्ट्रपती सचिवालय, पंतप्रधान कार्यालय, सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये आणि निवडणूक आयोगासह सर्व महत्त्वाच्या घटनात्मक संस्थांना पाठवण्यात आली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक नजर ठेवण्यास सांगण्यात आले आहे.

# सरकारी जमीन घोटाळ्यात मोठी कारवाई

मुंबई (वृत्तसंस्था)

जमिनीच्या रेकॉर्डमध्ये फेरफार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'कलम १५५'चा गैरवापर करणाऱ्या महसूल विभागातील १५ अधिकाऱ्यांवर अखेर निलंबनाची कुऱ्हाड पडली आहे. २९ जून रोजी कलम १५५ चा वापर करून राज्यभरात कशा सरकारी जमिनी लाटण्याचे राज्यभर रॅकेट असल्याचे समोर आणले होते. या वृत्ताचे विधान परिषदेत पडसाद उमटले आहेत.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुणे विभागातील पुण्यातील उपजिल्हाधिकारी, तहसीलदारांसह १५ अधिकारी निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. निलंबित करून शासन थांबणार नसून, या दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार आहेत. तसेच

काही बड्या अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, आमदार अनिल परब यांच्यासह विक्रम काळे यांनी हा प्रश्न विधानसभेत मांडला होता. दिव्य मराठीने छत्रपती संभाजीनगर, पुणे, नाशिक, भिवंडी, शहापूरसह शहरात शेकडो एकर सरकारी जमीन हडपल्याचे समोर आणले होते. पुणे विभागाच्या चौकशीत ४२४ प्रकरणे संशयास्पद असून, १३ प्रकरणांमध्ये थेट दोषी आढळलेले १५ अधिकारी-कर्मचारी निलंबित केले आहेत.

# भारतीय वंशाचा आणखी एक शास्त्रज्ञ अंतराळ मोहिमेवर



मुंबई (वृत्तसंस्था)

भारतीय वंशाचे अंतराळवीर अनिल मेनन हे १४ जुलै रोजी कझाकस्तानमधील बैकोनूर कॉस्मोड्रोम येथून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या आठ महिन्यांच्या मोहिमेसाठी रवाना होणार आहेत. मिनियापोलिस येथे युक्रेनियन आणि भारतीय वंशाच्या पालकांच्या पोटी जन्मलेले मेनन हे आपत्कालीन वैद्यकशास्त्रातील तज्ज्ञ डॉक्टर असून अमेरिकेच्या स्पेस फोर्समध्ये कर्नल पदावर कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर वास्तव्यास असताना मेनन दीर्घकालीन अंतराळ प्रवासाचा मानवी शरीरावर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी अनेक वैज्ञानिक प्रयोग करणार आहेत. सूक्ष्म गुरुत्वाकर्षणामुळे अंतराळवीरांच्या रक्ताभिसरणावर, रक्तवाहिन्यांच्या संरचनेवर आणि रक्ताच्या घटकांवर नेमका कसा परिणाम होतो, याचा ते सखोल अभ्यास करतील.

मेनन हे रशियाच्या रोस्कोस्मोस संस्थेच्या सोयुझ एमएस-२९ या अंतराळयानातून अंतराळात झेप घेणार आहेत. त्यांच्या सोबत रशियन अंतराळवीर प्योत्र दुब्रोव्ह आणि ॲना किकिना हे देखील या मोहिमेत सहभागी असतील. अमेरिकन हवाई दलातील सेवाकाळात त्यांनी 'ऑपरेशन एंड्युरिंग फ्रीडम' अंतर्गत अफगाणिस्तानमध्ये अग्रभागी काम केले. तसेच हिमालयन रेस्क्यू असोसिएशनसोबतही त्यांनी कार्य केले आहे. ४९ वर्षीय अनिल मेनन यांनी रोटरी ॲम्बेसेडोरियल स्कॉलर म्हणून भारतात एक वर्ष घालवले होते. या काळात त्यांनी पोलिओ लसीकरण मोहिमांचा अभ्यास केला आणि त्या मोहिमांमध्ये सक्रिय सहकार्य केले.अनिल मेनन यांनी २०१४ मध्ये नासामध्ये फ्लाइट सर्जन म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. या काळात त्यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर राहणाऱ्या आणि काम करणाऱ्या अंतराळवीरांसोबत जवळून काम केले.

२०१८ मध्ये ते स्पेसएक्समध्ये दाखल झाले, जिथे त्यांनी कंपनीचा वैद्यकीय कार्यक्रम सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी स्पेसएक्सच्या पहिल्या मानवी अंतराळ मोहिमेच्या तयारीत योगदान दिले तसेच स्टारशिप प्रकल्पाच्या विकासातही महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवला.

# शरद पवारांकडून महाराष्ट्र सरकारचे कौतुक



मुंबई (वृत्तसंस्था)

एनसीपी अध्यक्ष शरद पवार यांनी महाराष्ट्र सरकारच्या शेतकरी कर्जमाफी योजनेत झालेल्या बदलाचे कौतुक केले. ते म्हणाले की, सरकारच्या या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना फायदा होईल. पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभारही मानले.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एनडीएमध्ये सामील होण्याबद्दल किंवा काँग्रेसमध्ये विलीन होण्याबद्दलही चर्चा आहेत. तथापि, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी या सर्व चर्चा अफवा असल्याचे म्हटले आहे. सूत्रांनुसार, पवार यांच्या पक्षाचे नेते एनडीएमध्ये सामील होण्याच्या बाजूने नाहीत. काही नेत्यांनी यावर असहमती दर्शवली आहे.

खरेतर, या चर्चांना तेव्हा आणखी बळ मिळाले, जेव्हा शरद पवार यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर ८ जुलै रोजी मुंबईतील विधानभवनात बैठक घेतली होती. यानंतर पवार यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या दालनात आपल्या पक्षाच्या आमदारांची भेट घेतली. शरद पवार म्हणाले की, राज्य सरकारने नैसर्गिक आपत्त्या आणि शेतमालाच्या दरातील घसरण लक्षात घेऊन कर्जमाफी योजनेची घोषणा केली होती. मात्र, सुरुवातीला योजनेत काही अशा अटी ठेवण्यात आल्या होत्या, ज्यामुळे मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना लाभ मिळू शकला नाही.

# औषध कंपन्यांवर सरकारची करडी नजर

## जादा दराने विक्री केल्यास कारवाई

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

सर्वसामान्य रुग्णांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ऑथॉरिटी'ने ३९ जीवनरक्षक औषधांच्या कमाल किरकोळ किमती निश्चित केल्या आहेत. हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग, एचआयव्ही आणि जिवाणूजन्य संसर्गासारख्या गंभीर आजारांवरील औषधांचा यात समावेश असल्याने, यामुळे रुग्णांवरील उपचारांचा आर्थिक भार लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.

'ड्रग्ज (प्राइस कंट्रोल) ऑर्डर, २०१३' अंतर्गत केंद्रीय रसायन आणि खत मंत्रालयाने या दरांची घोषणा केली आहे. हे दर वस्तू आणि सेवा कर वगळून लागू करण्यात आले आहेत. एनपीपीएने स्पष्ट केले आहे की, आता कोणत्याही उत्पादक कंपनीला या निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त दराने औषधांची विक्री करता येणार नाही.या यादीत अनेक महागड्या औषधांचा समावेश आहे. हृदयविकाराच्या उपचारात वापरल्या जाणाऱ्या 'टेनेक्टेप्लेस' इंजेक्शनची किंमत ६०,२३८.२७ रुपये प्रति व्हायल निश्चित करण्यात आली आहे. अम्लोडिपिन आणि टेल्मिसार्टन गोळ्यांची किंमत प्रति गोळी १२.०३ रुपये, तर स्पिरिन आणि अटोरवास्टॅटिन कॅप्सूलची किंमत ३.६७ रुपये प्रति कॅप्सूल असेल. याशिवाय, मधुमेहाच्या रुग्णांसाठी लागणारी ग्लिमेपिराइड, वोग्लिबोस आणि मेटफॉर्मिन औषधे ८.८५ रुपये प्रति गोळी या दराने मिळणार आहेत.

एचआयव्ही उपचारासाठीच्या कॉम्बिनेशन किटची किंमत ३३०.४० रुपये निश्चित करण्यात आली आहे.एनपीपीएने औषध उत्पादक कंपन्यांना सुधारित किंमत सूची प्रसिद्ध करण्याचे बंधनकारक केले आहे. तसेच, औषध विक्रेत्यांना ही किंमत सूची ग्राहकांसाठी स्पष्टपणे प्रदर्शित करणे अनिवार्य आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर 'आवश्यक वस्तू कायदा, १९५५' अंतर्गत कठोर कारवाई केली जाईल. जादा दराने विक्री केल्यास ती अतिरिक्त रक्कम व्याजासह सरकारकडे जमा करावी लागणार आहे. सरकारच्या या निर्णयामुळे औषधांच्या किमतीत पारदर्शकता येणार असून, गंभीर आजारांवरील उपचार सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध होणार आहेत. हा निर्णय

# भारत-न्यूझीलंड दरम्यान मुक्त व्यापार करार फायनल

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पंतप्रधान मोदी यांनी शुक्रवारी न्यूझीलंडमधील ऑकलंड येथे पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेतली. यामध्ये १८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, ज्यात १० करारांवर (चेण) स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. दोन्ही नेत्यांनी २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करून सुमारे ३५ हजार कोटींपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले. दोन्ही देशांनी त्यांच्या संबंधांना धोरणात्मक भागीदारीचा दर्जा दिला. पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारत आणि न्यूझीलंड यांच्यात यावर्षी विक्रमी ९ महिन्यांत मुक्त व्यापार करार झाला आहे. न्यूझीलंड पुढील १५ वर्षांत भारतात १.७२ लाख कोटी (२० अब्ज डॉलर) गुंतवणूक करेल. तसेच 'विकसित भारत २०४७' च्या उद्दिष्टातही मदत करेल.

पंतप्रधान मोदी आज ऑकलंडमध्ये ४० हजार भारतीयांना संबोधित करतील. मोदी ६ ते ११ जुलैपर्यंतच्या त्यांच्या तीन देशांच्या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात न्यूझीलंडमध्ये पोहोचले आहेत. ते आजच नवी दिल्लीसाठी रवाना होतील. ४० वर्षांनंतर एखाद्या भारतीय पंतप्रधानांचा हा न्यूझीलंड दौरा आहे. यापूर्वी १९८६ मध्ये राजीव गांधी न्यूझीलंडला गेले होते. भारत आणि न्यूझीलंड दरम्यान २७ एप्रिल रोजी मुक्त व्यापार करार स्वाक्षरित झाला होता. आता भारतातून न्यूझीलंडला पाठवल्या जाणाऱ्या चामड्याची उत्पादने, वस्त्रोद्योग, प्लॅस्टिक आणि अभियांत्रिकी वस्तूंसारख्या वस्तूंवर कोणतेही निर्यात शुल्क लागणार नाही. यामुळे या श्रम-केंद्रित क्षेत्रांना म्हणजेच लेबर इंटेंसिव्ह सेक्टर्सना थेट फायदा होईल.

यावर पियुष गोयल म्हणाले होते की, हा FTA विश्वास, सामायिक मूल्ये आणि शाश्वत आर्थिक विकासाच्या सामायिक दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. हा करार भारतासाठी ओशनिया आणि प्रशांत बेटांवरील बाजारपेठांपर्यंत पोहोचण्याचे प्रवेशद्वार देखील बनेल.

# 'एक राष्ट्र, एक निवडणूक' २०२९ पर्यंत होणार कार्यान्वित : संयुक्त समिती प्रमुख

मुंबई (वृत्तसंस्था)

एकाच वेळी निवडणुका घेण्यासंबंधीच्या विधेयकांची तपासणी करणारी संसदेची संयुक्त समिती, २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांपर्यंत 'एक राष्ट्र, एक निवडणूक' ही सुधारणा पूर्णपणे कार्यान्वित करू शकेल अशी यंत्रणा तयार करण्याचे काम करत आहे, असे अध्यक्षांनी शुक्रवारी सांगितले.



गोव्यात पॅनेलच्या दोन दिवसीय बैठकीच्या निमित्ताने पत्रकारांशी बोलताना पी. पी. चौधरी यांनी दावा केला की, वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे होणारे अंदाजे ७ लाख कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान रोखण्याच्या उद्देशाने आणलेल्या प्रस्तावाला, आतापर्यंत सल्लामसलत केलेल्या नागरी समाजातील जवळपास ९९ टक्के हितधारकांनी पाठिंबा दिला आहे. समितीने गोव्यात मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांशी संवाद साधून संविधान (१२९ वी दुरुस्ती) विधेयक, २०२४ वर आपल्या विचारविनिमयाला सुरुवात केली. यावेळी एकाच वेळी निवडणुका राबवण्यामधील आव्हाने आणि त्यावर उपाययोजना यावर त्यांची मते जाणून घेण्यात आली. आम्ही गोव्याच्या जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मुख्यमंत्री आणि कॅबिनेट मंत्र्यांशी अनौपचारिक संवाद साधला. 'एक राष्ट्र, एक निवडणूक' कशी राबवता येईल, त्यात कोणती आव्हाने आहेत आणि सर्वांना मान्य असलेला समतोल साधत ती कशी कमी करता येतील, यावर आम्ही चर्चा केली, असे चौधरी म्हणाले.

त्यांनी सांगितले की, समितीने गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा आणि दिल्ली यांसह अनेक राज्यांना भेटी दिल्या असून, तिथे घटनातज्ञ, नागरी समाज संघटना, शिक्षणतज्ज्ञ आणि इतर हितधारकांशी संवाद साधला आहे. ज्यांच्याशी सल्लामसलत केली गेली त्यांपैकी बहुसंख्य लोकांनी एकाच वेळी निवडणुका घेण्याच्या कल्पनेला पाठिंबा दिला आहे, असे राजस्थानमधील पालीचे भाजप खासदार म्हणाले.

आमच्या असे लक्षात आले आहे की, जवळपास ९९ टक्के हितधारक, विशेषतः नागरी समाज आणि विविध संघटनांमधील, एकाच वेळी निवडणुका घेण्याच्या बाजूने आहेत. आता सर्व राजकीय पक्षांना मान्य होईल अशी एक यंत्रणा विकसित करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे ते म्हणाले. अंमलबजावणीच्या कालावधीबद्दल विचारले असता, त्यांनी सांगितले की समिती विविध पर्यायांचा विचार करत असून, २०२९ मध्ये होणाऱ्या पुढील सार्वत्रिक निवडणुकांपर्यंत ही सुधारणा कार्यान्वित होऊ शकते. ते म्हणाले की, जर राजकीय पक्ष आणि मुख्यमंत्री स्वेच्छेने आपापले निवडणूक चक्र जुळवून घेण्यास सहमत झाले, तर त्यापूर्वी काही राज्यांनाही संरेखित करण्याची शक्यता आहे. प्रस्तावामागील आर्थिक तर्क स्पष्ट करताना, चौधरी यांनी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीसमोर सादर केलेल्या निष्कर्षांचा हवाला दिला.

ते म्हणाले की, कोविंद समितीला सादर केलेल्या एका आर्थिक अभ्यासानुसार, देशभरात स्वतंत्रपणे निवडणुका घेतल्यास जवळपास ७ लाख कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान होते, तर एकाच वेळी निवडणुका घेतल्यास राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला तितकाच फायदा होऊ शकतो. निवडणुका आता एका राज्यापुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. देशात कुठेही निवडणुका झाल्या तरी त्याचा इतर राज्यांवर परिणाम होतो, कारण अर्थव्यवस्था एकमेकांशी जोडलेली आहे, असे चौधरी म्हणाले.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# विद्यार्थ्यांच्या ताटातील अन्न एफडीएच्या देखरेखीखाली

## तुकाराम मुंढे यांचा शाळांवर फोकस



आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न आणि औषध प्रशासनाचा कारभार हाती घेताच या खात्याची ताकद दिसली. अन्न पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले. दूध भेसळांविरोधात, मिष्टान्न आणि मिठाई तयार करणाऱ्यांचे पितळ उघडे पडले. राज्यभरात या खात्याने धडाधड धाडी घातल्या. त्यानंतर राज्याच्या दूध उत्पादनाचा आकडा थेट २५ टक्क्यांनी घसरला. अनेक बडी नावे भेसळीत समोर आली. हॉटेल चालकांचे धाबे दणाणले आहे. त्याचवेळी आता शाळांच्या उपाहारगृहांवर तुकाराम मुंढे यांची नजर वळली आहे. मध्यान्ह भोजन योजनाही रडारवर आली आहे. या योजनेतील भ्रष्टाचार यापूर्वी अनेकदा उघडकीस आला आहे. मध्यान्ह भोजन योजनेत अनेकदा विद्यार्थ्यांच्या जेवणात आळ्या सापडल्या, मेलेली माल आढळली आहे. या सर्व प्रकरणं पाहता आता विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना सोडले जाणार नसल्याचे समोर आले आहे. काय दिला अन्न आणि औषध प्रशासनाने इशारा?मध्यान्ह भोजन व शाळांमधील उपाहारगृहांच्या तपासणीसाठी अन्न औषध प्रशासन सरसावले आहे आता मुंबईतील खासगी शाळांमधील उपाहारगृहे तसेच मध्यान्ह भोजन पुरविणारे किचन शेड यांच्यावर एफडीएची करडी नजर असणार आहे. विभागाने मुख्याध्यापक, बचत गट, शिक्षणाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. मुंबईत विविध ठिकाणी शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक आणि बचत गट चालकांसोबत शुक्रवारी एक महत्त्वाची बैठक पार पडली.

**विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ नको**

अन्न सुरक्षा मानके अधिनियम २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने ही गतिमान कार्यवाही सुरू केली आहे. शालेय स्तरावर अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि विद्यार्थ्यांना सकस व संतुलित आहार मिळणे अत्यंत आवश्यक आहे. याचे पालन संबंधितांनी केले नाही, तर कठोर कारवाई करण्याचा इशारा या बैठकीत अन्न औषध प्रशासन विभागाचे साहाय्यक आयुक्त पी. आर. सिंगरवाड यांनी दिला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईतही मोहीम सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या आठवड्यात मंत्री नरहरी झिरवळ यांनी शाळेच्या ५०० मीटर परीसरात स्टिंग पेयावर बंदी घातली. या परिसरात त्याच्या विक्रीला आळा घालण्यात आला. आमदार विक्रम पाचपुते यांनी या शीतपेयाविषयी मोठा प्रश्न उपस्थित केला होता. स्टिंग एक स्वस्त एनर्जी ड्रिंक आहे. त्याच्या लेबलवरच लहान मुलांच्या आरोग्यासाठी हे पेय धोकादायक असल्याचे म्हटले आहे. तरीही सर्रास या स्टिंगचा शाळा परिसरात विक्री होत असल्याचा प्रश्न पाचपुते यांनी उपस्थित केला होता. या एनर्जी ड्रिंकमध्ये कॅफेनचे अतिप्रमाण विद्यार्थ्यांसाठी घातक असल्याचे त्यांनी समोर आणले. त्यानंतर सरकारने शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग विक्रीस बंदी घातली आहे. तर अनेक शहरात अजूनही शाळा परिसरात अशा पेयांची विक्री होत असल्याचे 'स्टिंग'मधून समोर आलेले आहे. त्यांच्यावर धडक कारवाई करण्याची मागणी होत आह

**राज्यातील शाळांमधील उपाहारगृहे, कँटीन आणि मध्यान्ह भोजन पुरविणाऱ्या किचन शेडची अन्न व औषध प्रशासनाकडून विशेष तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित, पौष्टिक आणि सकस आहार मिळावा, यासाठी अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अन्न तयार करण्याची प्रक्रिया, वापरण्यात येणारा कच्चा माल, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, अन्न साठवणुकीची व्यवस्था, स्वयंपाकगृहातील स्वच्छता तसेच अन्न वितरणाची पद्धत यांची सखोल तपासणी केली जाणार आहे. मध्यान्ह भोजन योजनेत यापूर्वी अनेक वेळा निकृष्ट दर्जाचे अन्न, जेवणामध्ये आळ्या आढळणे तसेच अस्वच्छतेच्या तक्रारी समोर आल्याने प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट संबंधित असलेल्या या बाबींमध्ये कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.**

# साईकृपा ट्रेडर्स यांच्याकडून विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप



युवावार्ता (प्रतिनिधी)

शेडगाव- साईकृपा ट्रेडर्स होलसेल पशुखाद्य यांच्या वतीने तसेच सह्याद्री पशुखाद्य यांच्या विद्यमाने शिपलापूर ता. संगमनेर येथील विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे मोफत वाटप करण्यात आले. नव्या शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमास युवा उद्योजक दिनकर बोंद्रे, शंकर बोंद्रे, सरपंच प्रमोद बोंद्रे, भानुदास रकटे, सुभाष नागरे, अमोल नागरे, राजू मनतोडे, गोसावी सर व शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तसेच सह्याद्री पशुखाद्यचे नितीन हासे, समीर नवले व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास करून उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले. या सामाजिक उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांसह पालकांनी साईकृपा ट्रेडर्स व सह्याद्री पशुखाद्य यांचे आभार मानले.

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME MOHAMMAD ZAID NASIR JAMADAR

NEW NAME AS MOHAMMADZAID NASIR JAMADAR

ADD – OPPOSITE JAMA MASJID ,NAIKWADPURA ,SANGAMNER TAL- SANGAMNER , DIST - AHMEDNAGAR

वाटचाल तीन दशकांची
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३१४६०
dailyyuvavarta@gmail.com

# संतांचे संगती... आत्मज्ञानाची प्रगती

## श्री विठ्ठलाचे लाडके - संत नामदेव महाराज



संत नामदेव हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे आद्य प्रचारक, थोर संत कवी आणि कीर्तन परंपरेचे जनक म्हणून ओळखले जातात. त्यांनी १३व्या-१४व्या शतकात भागवत धर्माचा आणि विठ्ठल भक्तीचा प्रसार करून सामान्य जनतेला भक्तिमार्ग दाखवला आणि समाजात समता, भक्ती आणि नामस्मरणाचा संदेश दिला.

संत नामदेवांचा जन्म शके ११९२, कार्तिक शुद्ध एकादशी अर्थात २६ ऑक्टोबर १२७० रोजी नरसी-बामणी या गावी झाला. हे गाव सध्याच्या हिंगोली जिल्ह्यात आहे. त्यांचे वडील दामाशेटी ऊर्फ दामाजी शेट आणि आई गोणाई होत्या. रेळेकर आडनाव असलेले हे शिंपी समाजातील कुटुंब सात पिढ्यांपासून विठ्ठलभक्त होते. त्यांना आऊबाई नावाची मोठी बहीण होती. त्यांचा विवाह राजाई ऊर्फ राधाबाई यांच्याशी झाला. त्यांना नारायण, विठा, गोंदा, महादा हे चार पुत्र आणि लिंबाई नावाची एक कन्या होती. स्वतःला नामाची दासी म्हणवणाऱ्या संत जनाबाईही त्यांच्या कुटुंबाचा एक भाग होत्या. बालपण पंढरपुरात गेल्याने लहानपणापासूनच त्यांच्यावर विठ्ठलभक्तीचे संस्कार झाले.

तरुणपणी नामदेवांना देवदर्शनाची प्रचंड ओढ लागली होती. मात्र त्यात थोडासा अहंकारही होता. तेरडोकी येथे गोरा कुंभार यांच्या घरी भरलेल्या संतमेळाव्यात निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई आणि चोखामेळा यांसारखे संत उपस्थित होते. गोरा कुंभारांनी सर्व संतांची परीक्षा घेतली असता नामदेव अजून आत्मज्ञानाने परिपक्व झाले नसल्याचे स्पष्ट झाले. हा प्रसंग त्यांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा ठरला. त्यानंतर विठ्ठलाच्या आज्ञेने त्यांनी विसोबा खेचर यांना गुरु मानले. विसोबा यांनी त्यांचा अहंकार दूर करून त्यांना खऱ्या भक्तिमार्गाची दिशा दाखवली.

संत ज्ञानेश्वरांसोबत नामदेवांनी भारतभर तीर्थयात्रा केली. नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी हे त्यांचे जीवनसूत्र होते. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी भागवत धर्म घराघरात पोहोचवला. नामदेव कीर्तन करी, पुढे देव नाचे पांडुरंग अशी त्यांची ख्याती होती. ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर त्यांनी एकट्याने देशभर भ्रमण केले आणि जवळपास १८ वर्षे पंजाबमध्ये राहून भक्तीचा प्रचार केला. त्यांच्या प्रभावामुळे शीख परंपरेवरही वारकरी विचारांचा प्रभाव पडल्याचे मानले जाते. त्यांच्या ६२ रचना नामदेवजी की मुखबानी या नावाने शीख धर्मग्रंथ गुरु ग्रंथ साहेबामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यांनी मराठीत सुमारे २५०० अभंग आणि हिंदी-शौरसेनी भाषेत १२५ पदांची रचना केली.

संत नामदेवांचे तत्त्वज्ञान सर्वसमावेशक आणि समतेचा संदेश देणारे होते. त्यांनी जातिभेद, कर्मकांड आणि बाह्य आडंबराला विरोध केला. कुंभाराच्या घरी मडक्यात देव दिसे, चांभाराच्या घरी जोड्यात देव बसे असे सांगून त्यांनी प्रत्येक जीवात आणि प्रत्येक ठिकाणी परमेश्वराचे अस्तित्व पाहण्याची शिकवण दिली. तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल आणि अमृताहूनि गोड नाम तुझे देवा या अभंगांमधून त्यांनी नामस्मरणाचे महत्त्व अधोरेखित केले.

त्यांच्या जीवनाशी संबंधित अनेक चमत्कार आजही भक्तिभावाने सांगितले जातात. लहानपणी विठ्ठलाने नैवेद्य स्वीकारल्याची कथा, औंढा नागनाथ येथे मंदिराच्या दिशेबदलाची आख्यायिका, तसेच जनाबाईसाठी केलेली मदत यांसारख्या घटना त्यांच्या निष्कपट भक्तीचे प्रतीक मानल्या जातात. सुमारे ८० वर्षांचे आयुष्य लाभलेल्या संत नामदेवांनी शके १२७२ आषाढ वद्य त्रयोदशी, म्हणजे ३ जुलै १३५० रोजी पंढरपूर येथे विठ्ठल मंदिराच्या महाद्वाराच्या पहिल्या पायरीवर समाधी घेतली. ही जागा आजही नामाची पायरी म्हणून ओळखली जाते आणि लाखो वारकरी तेथे श्रद्धेने माथा टेकवतात.

संत नामदेवांनी महाराष्ट्राला भक्ती, समता, कीर्तन आणि नामस्मरणाचा अमूल्य वारसा दिला. उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारा ते एक महत्त्वाचा दुवा ठरले. त्यांच्या कार्यामुळे वारकरी संप्रदायाला देशव्यापी स्वरूप प्राप्त झाले. आजही लाखो वारकरी ज्ञानदेव-तुकाराम बरोबर संत नामदेवांचा जयघोष करत पंढरीची वारी करतात आणि त्यांच्या अभंगांतून भक्तीचा संदेश समाजात पोहोचवत राहतात.



संकलन, संतचरणरज...
**श्री. सदाशिव रामनाथ मुळे**
दैनिक युवावार्ता, संगमनेर
(पुणे प्रतिनिधी), मो . ८६६८३२७१७४
सौजन्य - निजध्यास...

# ज्ञानमाता विद्यालयात विद्यार्थी प्रतिनिधी शपथ समारंभ उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ज्ञानमाता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता पाचवी ते बारावीतील वर्ग प्रतिनिधी शपथ ग्रहण समारंभ संगमनेर येथील शहर सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सचिन वाकडे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रम प्रसंगी पाचवी ते बारावीतील एक विद्यार्थी प्रतिनिधी व विद्यार्थिनी प्रतिनिधी यांना नेतृत्व, प्रामाणिकपणा व शिस्त इत्यादी विविध नैतिक मूल्य आत्मसात करून आदर्श वर्तन राहील याची शपथ देण्यात आली. तसेच आपापल्या वर्गातील विद्यार्थ्यांकडून शालेय नियमांचे व शिस्तीचे पालन होईल याची जाणीव देखील करून दिली. याप्रसंगी श्री सचिन वाकडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की नववी ते बारावीतील विद्यार्थ्यांनी सर्वत्र वर्तणूक चांगली राहील याची काळजी घ्यावी. सध्या सोशल मीडियाचा उपयोग सर्वांनी काळजीपूर्वक व चांगल्या कमाकरिता वापर केला पाहिजे. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र कर्डिले यांनी केले तर आभार प्रतिभा रोहम यांनी मांडले. वर्ग प्रतिनिधींना श्वेता थोरात हिने शपथ दिली. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर यांनी नेतृत्व गुण व अभ्यास याविषयी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुवर्णा जाधव यांनी केले, तर पल्लवी कुलकर्णी यांनी नेतृत्व गुण याविषयी माहिती दिली.

**दि बारामती सहकारी बँक लि.** — **जंगम मालमत्तेचा जाहिर लिलाव**

मुख्यालय : भिगवण रोड, बारामती, जि. पुणे

**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १५६ च्या अधिन व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या कलम १०७ सह)**

तमाम लोकांना कळविण्यात येते की, बँकेच्या संगमनेर शाखेचे खालील कर्ज थकबाकीदार / गहाणखतदार व त्यांचे जामीनदार यांनी कर्जाची परतफेड न केल्यामुळे वसुली अधिकारी यांनी जप्त केलेली **' जेथे व जशी आहे त्या स्थितीत '** जंगम मिळकतीचे जाहीर लिलावाने विक्री दि बारामती सहकारी बँक लि. **शाखा - संगमनेर** या ठिकाणी व खाली नमूद केलेल्या वेळेत होणार आहे. तरी ज्या इच्छुक खरेदीदारांना सदरची मिळकत घ्यावयाची असेल, त्यांनी दिलेल्या वेळेपूर्वी एक तास आगोदर लिलावाच्या ठिकाणी उपस्थित राहावे.

| अ. क्र. | कर्ज थकबाकीदाराचे नाव | वसुली दाखला क्रमांक, दिनांक व वसुलपात्र रक्कम | दिनांक, वेळ व स्थळ |
|---|---|---|---|
| १ | **१) श्री. रामनाथ सखाराम तोरकडी**, मु. धांदरफळ बु, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, **२) सौ. अनिता शंकर गोर्डे**, रा. लोटस इंग्लिश मेडीयम शेजारी, मालपाणीनगर, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, **३) श्री. किरण रामनाथ तोरकडी**, धांदरफळ बु ता. संगमनेर जि. अहिल्यानगर . | **१) दाखला क्रमांक:-** कलम १०१/२४८/२०२५, दि. ०५/०२/२०२६, रु. ७१,३४०.०८ /- अधिक येणे व्याज | **मंगळवार २१/०७/२०२६** **सोमवार - २७/०७/२०२६** वेळ - सकाळी ११.०० वा. **स्थळ -** शाखा : संगमनेर जाणता राजा मार्ग, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर |
| | **जंगम मालमत्तेचा तपशील : श्री रामनाथ सखाराम तोरकडी यांच्या मालकीची टाटा टीयेगो कंपनीची चार चाकी वाहन क्र. MH 01 CT 0118** **वाजवी मुल्यांकन : रु. २,६५,०००/- ( अक्षरी रु. दोन लाख पासष्ठ हजार फक्त )** | | |

टिप : १) कोणतेही कारण न दाखविता लिलाव मंजूर करणे अगर नामंजूर करणे, लिलाव स्थगित करणे वा पुढे ढकलणे याबाबतचे सर्व अधिकार खाली सही करणार वसुली अधिकारी व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. २) लिलावाच्या अटी व शर्तीचे वाचन लिलावाच्या वेळी करण्यात येईल. तत्पुर्वी अटी व शर्ती वसुली अधिकारी दि बारामती सहकारी बँक लि. मुख्यालय भिगवण रोड, बारामती, जि. पुणे व बँकेच्या संगमनेर शाखा येथे पहावयास मिळतील ३) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झालेस लिलाव रद्द करणे त येईल ४) सदर तारखेच्या लिलावास कोणतेही बोलीधारक न आल्यास या तारखेपासून ७ दिवसाच्या आत म्हणजेच **दि. २७ / ०७ / २०२६** रोजी याच ठिकाणी लिलाव घेण्यात येतील व त्यासाठी आपणास वेगळी नोटीस दिली जाणार नाही.५) लिलाव पूर्वी वाहन पाहणी करण्यासाठी शाखाधिकारी संगमनेर शाखा यांची भेट घ्यावी.

सिल

सही /-
**श्री. नवनाथ यशवंत जगताप**
वसुली व विक्री अधिकारी, दि बारामती सहकारी बँक लि. बारामती, मो.क्र. ८३९०५७३३३३

(वरील आदेश हा वसुली व विक्री अधिकारी दि बारामती सहकारी बँक लि. बारामती यांचा संक्षिप्त भाग असून मूळ आदेश बँकेच्या सूचना फलकावर लावून प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. वरील जंगम मालमत्तेचा जाहीर लिलाव कर्ज थकबाकीदार / मालमत्ताधारक यांना जप्त केलेल्या जंगम मालमत्तेच्या विक्री संबंधी जाहीरनामा व नियम क्र. १०७ नुसार दि. ०७/०७/२०२६ रोजी रजिस्टर पोस्टाद्वारे दिलेल्या नोटीसीचा पुरवणी भाग असून थकबाकीदार, मालमत्ताधारक व तमाम जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. कायदेशीर बाबींसाठी दि. ०७ / ०७ / २०२६ रोजी दिलेली नोटीस ग्राह्य धरावी)

## संपादकीय...

# वाढती लोकसंख्या आणि शाश्वत विकासाचे आव्हान

दरवर्षी ११ जुलै हा दिवस जगभरात जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. वाढती लोकसंख्या, तिचा पर्यावरण, अर्थव्यवस्था, आरोग्य, शिक्षण आणि रोजगारावर होणारा परिणाम याबाबत जनजागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १९८९ पासून या दिवसाची सुरुवात केली. वाढती लोकसंख्या ही कोणत्याही देशासाठी एकीकडे मोठी ताकद ठरू शकते, तर दुसरीकडे योग्य नियोजन नसल्यास ती विकासाच्या मार्गातील मोठे आव्हान बनू शकते. भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला आहे. देशाची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली असून या प्रचंड लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करणे हे सरकार आणि प्रशासनासमोरचे मोठे आव्हान आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांपासून शिक्षण, आरोग्य, रोजगार, पिण्याचे पाणी आणि वाहतूक व्यवस्था यांसारख्या सुविधांवर वाढत्या लोकसंख्येचा मोठा ताण पडत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्वाधिक परिणाम नैसर्गिक संसाधनांवर होत आहे. शेतीयोग्य जमीन कमी होत आहे, पाण्याचे स्रोत आटत आहेत आणि जंगलांचे क्षेत्र झपाट्याने घटत आहे. वाढत्या नागरीकरणामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत असून प्रदूषणाच्या समस्याही गंभीर बनत आहेत. हवामान बदल, तापमानवाढ आणि पाण्याची टंचाई यांसारख्या समस्या भविष्यात अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे रोजगारनिर्मितीचे आव्हानही अधिक मोठे झाले आहे. दरवर्षी लाखो युवक शिक्षण पूर्ण करून रोजगाराच्या शोधात बाहेर पडतात. मात्र, उपलब्ध रोजगाराच्या संधी त्याच्या तुलनेत कमी असल्याने बेरोजगारीची समस्या वाढत आहे. बेरोजगारीमुळे आर्थिक आणि सामाजिक समस्याही निर्माण होत आहेत. त्यामुळे कौशल्य विकास, उद्योजकता आणि स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज बनली आहे. आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रावरही लोकसंख्या वाढीचा मोठा परिणाम दिसून येतो. सरकारी रुग्णालयांवरील ताण वाढत असून अनेक ठिकाणी पुरेशा वैद्यकीय सुविधा उपलब्ध नाहीत. त्याचप्रमाणे शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे मोठे आव्हान बनले आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आरोग्य सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी अधिक प्रभावी नियोजनाची आवश्यकता आहे. मात्र, लोकसंख्या ही केवळ समस्या नसून ती देशाची मोठी ताकदही ठरू शकते. भारतातील मोठी युवा लोकसंख्या ही देशाच्या विकासासाठी सुवर्णसंधी मानली जाते. योग्य शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास हीच युवा शक्ती देशाच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया बनू शकते. जगातील अनेक देशांमध्ये वृद्धांची संख्या वाढत असताना भारताकडे तरुण मनुष्यबळाचा मोठा साठा आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी जनजागृती, महिलांचे शिक्षण, आरोग्य सेवा आणि कुटुंब नियोजन यांना विशेष महत्त्व आहे. महिलांचे शिक्षण आणि सक्षमीकरण वाढल्यास कुटुंब नियोजनाबाबत जागरूकता वाढते आणि लोकसंख्या वाढीचा वेग नियंत्रित करण्यास मदत होते. ग्रामीण भागात आरोग्य सेवा आणि जनजागृती मोहिमा प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. जागतिक लोकसंख्या दिन हा केवळ लोकसंख्येच्या आकडेवारीचा विचार करण्याचा दिवस नसून विकास आणि संस[illegible]त चिंतन करण्याची संधी आहे. वाढती लोकसंख्या आणि उपलब्ध संसाधने यांच्यात योग्य समतोल राखणे ही काळाची गरज आहे. शाश्वत विकास, पर्यावरण संरक्षण आणि भविष्यातील पिढ्यांचे हित लक्षात घेऊन नियोजन केल्यास लोकसंख्या ही समस्या न राहता विकासाची मोठी ताकद ठरू शकते. लोकसंख्या वाढीच्या आव्हानांना सामोरे जाताना प्रत्येक नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवणे आणि कुटुंब नियोजन, शिक्षण व संसाधनांच्या योग्य वापराबाबत सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. जागतिक लोकसंख्या दिन हा याच सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आणि शाश्वत भविष्याचा मार्ग दाखवणारा महत्त्वाचा दिवस आहे.

# संगमनेरच्या विकासातील जलक्रांती आणि दूरदृष्टीचे प्रतीक




संगमनेर म्हटले की सर्वप्रथम डोळ्यासमोर उभी राहते ती जीवनदायिनी प्रवरा नदी. मात्र संपूर्ण तालुक्याचे चित्र पाहिले तर नदीकाठचा काही भाग वगळता मोठा भूभाग हा पठारी, अवर्षणग्रस्त आणि दुष्काळाच्या झळा सहन करणारा आहे. तळेगावसह अनेक गावांनी वर्षानुवर्षे पाण्याच्या टंचाईचा सामना केला आहे. अशा परिस्थितीत सहकार चळवळीने या भागाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

मा. भाऊसाहेब थोरात यांच्या दूरदृष्टीतून उभा राहिलेला सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना आणि त्यापूर्वीचा संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना यांनी परिसरातील शेतीला नवे बळ दिले. उसाच्या उत्पादनाला चालना देण्यासाठी प्रवरा नदीलगत विविध पाइपलाइन उभारण्यात आल्या. त्यामुळे सिंचनाची सुविधा वाढली, उत्पादनात भर पडली आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग खुला झाला. केवळ शेतीवर अवलंबून राहून शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास शक्य नाही, ही जाणीव ठेवून संगमनेर तालुका दूध संघाची स्थापना करण्यात आली. गावोगावी आणि वाडी-वस्त्यांवर दूध संकलन केंद्रे उभारल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. साखर कारखाना आणि दूध संघ या दोन्ही संस्थांनी संगमनेरच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात मोलाचे योगदान दिले. संगमनेर शहर वाढत असताना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनत होता. वाढती लोकसंख्या, मर्यादित जलस्रोत आणि अपुरी वितरण व्यवस्था यामुळे नागरिकांना कमी वेळ पाणी मिळत असे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून तत्कालीन नगराध्यक्षा मा. अंजलीताई सुधीर तांबे यांनी निळवंडे धरणातून थेट संगमनेर शहरापर्यंत पाइपलाइन आणण्याचे धाडसी स्वप्न पाहिले. अनेक तांत्रिक, आर्थिक आणि भौगोलिक अडचणींवर मात करत हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रत्यक्षात साकार झाला. आज या योजनेमुळे संगमनेर शहराला मुबलक, स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा होत आहे. पूर्वी अर्धा ते एक तास मिळणारे पाणी आता अधिक समाधानकारक प्रमाणात उपलब्ध झाले आहे. कोणतीही मोठी कलाकृती पाहताना तिच्यामागील कलाकाराचे कष्ट सहज दिसत नाहीत; त्याचप्रमाणे अशा विकासकामांमागील नियोजन, चिकाटी, संघर्ष आणि दूरदृष्टी सामान्यांच्या नजरेस पडत नाही. मोठ्या पाइपलाइनसारखा प्रकल्प उभारणे म्हणजे केवळ निविदा मंजूर करणे नव्हे, तर भविष्याचा विचार करून गुणवत्तापूर्ण आणि दीर्घकाळ टिकणारी व्यवस्था निर्माण करणे होय. संगमनेरच्या जलप्रश्नावर कायमस्वरूपी उपाय शोधण्याचा हा प्रयत्न दूरदृष्टी, विकासनिष्ठा आणि लोकहिताचा आदर्श ठरला आहे.

**विश्वासराव पंढरीनाथ रोहम**
**वाघापुर, ता. संगमनेर**

# रविवारी पालक-शिक्षक मेळावा

## प्रख्यात व्याख्याते इंद्रजीत देशमुख करणार मार्गदर्शन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर तसेच तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १२ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजता 'पालक-शिक्षक मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. सप्तश्रृंगी मंदिराजवळील अकोले बायपास रोडवरील मातोश्री मंगल कार्यालय येथे हा मेळावा होणार असून, प्रख्यात व्याख्याते इंद्रजीत दत्ताजीराव देशमुख हे पालकांना मार्गदर्शन करणार आहेत.

सध्याच्या काळात मोबाईलचा वाढता वापर, व्यसनाधीनता, हिंसक प्रवृत्ती आणि बदलती जीवनशैली यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासासमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर पालकांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरत असून, मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचा संदेश या मेळाव्यातून दिला जाणार आहे.

व्याख्यानामध्ये अभ्यासाचे तंत्र आणि पालकांचा सहभाग, विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढविण्याचे उपाय, कुटुंब व समाजातील उत्तम वर्तनाचे संस्कार तसेच आरोग्यदायी जीवनशैली या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याशिवाय शिक्षण क्षेत्रातील बदल, विद्यार्थ्यांचे करिअर, प्रगती आणि संस्कार याबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शनही पालकांना मिळणार आहे. सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाजाचे चेअरमन डॉ. सुधीर तांबे यांनी तालुक्यातील सर्व पालकांनी या मेळाव्यास आवर्जून उपस्थित राहून आपल्या पाल्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# संतांची वारी, संस्कारांची शिदोरी



संतांचा पालखी सोहळा म्हणजे सांस्कृतिक जीवन समृद्ध करणे होय. या पालखी सोहळ्यातून भक्ती सदाचार, सहिष्णुता आपल्याला शिकायला मिळते. हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. डॉक्टर शंकर अभ्यंकर विद्यावाचस्पती हे म्हणतात की, वारकरी संप्रदायाचे भाग्य स्वतः संत श्रेष्ठ ज्ञानदेव या विभूतीने भागवत धर्माला शिरोधार्य केले. संत नामदेवांनी चे ही ध्वजा गंगा सिंधू खोऱ्यात नेली .संत एकनाथ महाराजांनी समाजातील जातिभेद नाहीसे व्हावे म्हणून एक क्रांती केली. स्वतःच्या अभ्यासाने चिकाटीने ,श्रद्धेने नराचा नारायण होऊ शकतो, हे संतश्रेष्ठ तुकारामांनी सिद्ध करून दाखवले. आपण संतांच्या पालखी उचलतो. कारण संतांनी आपल्याला आत्मोद्धराचा मार्ग दाखवला. पंढरीची वारी ही देवाची वारी आहे तर आळंदीची वारी ही संतांची वारी आहे या सर्व संतांना वैकुंठापेक्षा पंढरी ही श्रेष्ठ सर्वश्रेष्ठ वाटते. कारण हे महायोग पिठ आहे,आणि या ठिकाणी ही विश्वाची माऊली ,विठू माऊली येऊन मार्गदर्शन करीत आहे. विठ्ठल हरिहर हे प्रतीक आहे. डॉक्टर शिवाजीराव भोसले म्हणतात, पालखी सोहळा हे जीवनदर्शन आहे. ही धार्मिक यात्रा नाही. हे चालते बोलते विद्यापीठ आहे. या विद्यापीठात अठरा पगड जातींना प्रवेश आहे. या विद्यापीठात एंट्रन्स परीक्षा नाही. संत श्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात, हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा.। ज्यांना देवाचा विसर झालेला नाही ,त्यांना त्या चालत्या बोलत्या विद्यापीठात प्रवेश आहे.संत श्रेष्ठ तुकाराम महाराज यांनी हे स्वत:साठी मागितले नाही. तर आपल्यासाठी मागितले आहे. माणसाला जास्त पैसा आला की, जास्त शिकला की आणि सत्ता आली की, तो हवेत वावरतो.अशा लोकांसाठी हे दान मागितले आहे. माणसाला देवाचे ज्ञान आणि आपल्या जगण्याचे भान आले की, पालखी सोहळा सुरू होतो. आपली आध्यात्मिक उन्नती या सोहळ्यातून होते. ज्ञानोबा तुकाराम गजर आपल्यातील अहंकार नष्ट करतो, आपल्याला समाजाशी जोडतो, आणि समष्टीची भावना जागृत करतो. या सोहळ्यात आपण आपले आत्म हित साधले पाहिजे. सर्वात संतांना समाजात खूप मोठे स्थान आहे संतांनी अध्यात्मिकता सामाजिक समता, अंधश्रद्धा, अज्ञान दूर केले आणि मानवतावाद सांगितला. नैतिक विचारांचे संस्कार आणि जीवणाचा खरा मार्ग दाखवला. आज समाजामध्ये अत्यंत रोबोट स्पर्धा निर्माण झाली आहे ताण तणाव अशांतता सगळीकडे बघावयास मिळत आहे अशावेळी आपल्या जगण्याची मूल्ये बंधुत्वाचे विचार सहिष्णुता पर्यावरण रक्षण हे आपल्याला या पालखी सोहळ्यातून मिळते. आज आपण आत्मभान विसरलो आहोत. आपल्याला आपल्या जगण्यातील तथ्य कळले पाहिजे. ते कळले की मग समाजामध्ये अनुबंधी निर्माण होतात आणि हे संतांचे विचार पालखी सोहळ्याद्वारे ये हृदयीचे ते हृदयी नेता येतातक गंधे.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**


**पाहिजेत**
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
- संपर्क -
8888808397

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क- जाधव सोनोग्राफी सेंटर
मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
मॉम-एबल फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटर, संगमनेर
आरएमओ (महिला) - १
शैक्षणिक पात्रता : BAMS / BHMS
नर्सिंग स्टाफ (रात्रपाळी) - १
हाऊसकीपिंग मावशी - २
घर कामासाठी मावशी - १
(सकाळी ९ ते सायंकाळी ५)
— संपर्क —
9860477807

**पाहिजेत**
हिशोब करण्याकरिता दोन मुले पाहिजे
(कॉम्प्युटर येणे आवश्यक)
ए. जी. एस. टोमॅटो सप्लायर्स
टोमॅटो मार्केट यार्ड, संगमनेर
दुकान क्रमांक : १२३४५
7741816770
9763531663

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
प्रो-माईन्ड एआय आयटी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटसाठी त्वरित दोन जागा भरणे आहे.
(B.E Comp/IT, BCA/BCS)
— संपर्क —
8282825818

**पाहिजेत**
ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर)
अकाउंटट - २ (टॅली)
कॉम्प्युटर ऑपरेटर -२ पदवीधर
डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर
9822791484
9518556933
9370017177

**ड्रायव्हार पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
- संपर्क -
9117175050

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397






# स्वस्त धान्य योजनेत मोठा बदल

मुंबई (वृत्तसंस्था)

केंद्र सरकारने अन्नधान्य वितरण प्रणालीत अमुलाग्र बदल करण्याची योजना आखली आहे. 'वन नेशन, वन राशन' योजना राबवण्यासाठी सरकार आग्रही आहे. त्याअगोदर राज्यात अनेक बदल करण्यात येत आहे. बोगस लाभार्थी आणि अधिक उत्पन्न प्राप्त लाभार्थी कमी करण्यासाठी विविध उपाय योजना करण्यात येत आहे. स्मार्ट रेशन कार्ड योजना अनेक राज्यात राबवण्यात येत आहे. तर केंद्र सरकारने अजून एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. स्वस्त धान्य योजनेत सध्या कुटुंबाआधारीत रेशन वितरीत होते. कुटुंबाला अन्नधान्य देण्यात येते. ही पद्धत बंद करून कुटुंबाऐवजी व्यक्तीला राशन देण्याची केंद्राची तयारी आहे. त्यासाठी एक मसुदा तयार करण्यात आला आहे. साधक बाधक चर्चा, हरकती आणि सूचना प्राप्त झाल्यानंतर तरतुदी लागू होतील.केंद्र सरकारने मोफत रेशन योजना नियमात बदल करण्यासाठी पावलं टाकली आहेत. सध्या स्वस्त धान्य वितरण प्रणालीतंर्गत एका कुटुंबाला ३५ किलो धान्य देण्यात येते.

त्याऐवजी आता प्रत्येक व्यक्तीला ७ किलो धान्य पुरवठा करण्याचा विचार आहे. या बदलासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा(दुरुस्ती) विधेयक, २०२६ हा मसुदा तयार केला आहे. या मसुद्यावर हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. १३ जुलैपर्यंत सूचना मागवण्यात आल्या आहेत. पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेतंर्गत देशातील ८१ कोटी लोकांना धान्य उपलब्ध करून दिले जाते.सध्याच्या नियमानुसार कुटुंब केंद्रीत अन्नधान्य वितरीत करण्यात येते. कुटुंब लहान असो वा मोठे ३५ किलो धान्य देण्यात येते. कुटुंब मर्यादीत असेल तर त्याला जास्त धान्य मिळते. तर मोठ्या कुटुंबाला गरजेपेक्षा कमी धान्य मिळते. या नवीन मसुदाचा पाच पेक्षा अधिक सदस्य असलेल्या कुटुंबांना फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.राज्यात लवकरच लाभार्थ्यांना स्मार्ट रेशन कार्ड देण्यात येणार आहे.

प्रत्येक रेशन कार्डला स्वतंत्र क्यूआर कोड असेल. क्युआर कोडमुळे लाभार्थ्यांची माहिती समोर येईल. बोगस लाभार्थी उघड होतील. काळाबाजारही समोर येईल. रेशन कार्ड आधार कार्डशीही जोडल्या जाणार असल्याने जे सरकारी अधिकारी, कर्मचारी अथवा श्रीमंत योजनेचा लाभ घेत असतील तर ते उघड होईल. बोगस लाभार्थ्यांची नावे यादीतून वगळण्यात येतील.

# पळसखेडेच्या जलसंधारणाला बळ

## गाळ उपसा आणि वृक्षारोपण उपक्रम

युवावार्ता (प्रतिनिधी)

तळेगाव - महाराष्ट्र शासनाच्या गाळमुक्त शिवार व गाळयुक्त धरण योजनेअंतर्गत संगमनेर तालुक्यातील पळसखेडे येथे सुरू असलेल्या गाळ काढण्याच्या कामाची पाहणी करण्यात आली. सदर काम समाधानकारक आणि वेगाने सुरू असल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.





यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या तसेच काढण्यात येणाऱ्या गाळाची नोंद अवनी ॲपवर वेळेत करण्याच्या सूचना देण्यात आल्या. दरम्यान, गाव तलाव परिसरात कारभारी दादा शिवार प्रतिष्ठानच्यावतीने फळझाडे तसेच पर्यावरणपूरक वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये चिंच, आंबा, जांभूळ, वड, पिंपळ आदी उपयुक्त वृक्षांची लागवड मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. या प्रसंगी जिल्हा परिषद उपविभाग संगमनेरचे उपअभियंता विनायक पंडोरे, कनिष्ठ अभियंता भारत कोळी, संतोष आहेर, पळसखेडे गावचे सरपंच संपत काशिनाथ कांडेकर, इंजि. संदीप रामकृष्ण कांडेकर, रामदास भाऊराव लहरे, साहेबराव गणपत कांडेकर, रोहिदास केशव वाघ, ग्रामविकास अधिकारी तडवी भाऊसाहेब, ज्ञानेश्वर कांडेकर, राहुल कांडेकर, रोहिदास माळी, किर्ती जायभाये, बाळासाहेब गिते, तुषार गिते, चेतन आव्हाड, संतोष गिते यांच्यासह पळसखेडे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या तलावातून अंदाजे ५० हजार घनमीटर गाळ काढण्यात येणार असून त्यामुळे सुमारे १२५ हेक्टर क्षेत्रावरील जमीन अधिक सुपीक होण्यास मदत होणार आहे. तसेच तलावामध्ये सुमारे ५ कोटी लिटर अतिरिक्त पाणीसाठा निर्माण होणार असल्याने परिसरातील जलसंधारणाला मोठा हातभार लागणार आहे.

योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना गाळ मोफत उपलब्ध करून दिला जात असून तो स्वखर्चाने वाहून नेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांना गाळ वाहतुकीसाठी शासनाकडून प्रति हेक्टर ३५ हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# शिवाजीराव मंडलिक यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्हा बँकेतील सरव्यवस्थापक तसेच भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेचे संचालक तसेच सहकारी बँकेच्या सेवक पतसंस्थेचे संचालक शिवाजीराव दगडू मंडलीक यांचे १० जुलै २०२६ रोजी निधन झाले आहे. सहकार क्षेत्रातील अनुभवी व्यक्तीमत्व म्हणून त्यांचे मार्गदर्शन महत्वाचे होते. मृत्यूसमयी त्यांचे वय ८२ होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन भाऊ, एक बहिण, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी शनिवार दि. ११ जुलै रोजी संगमनेर येथील स्मशानभुमीत करण्यात आला.

याप्रसंगी सहकार क्षेत्रातील, रायतेवाडी व पंचक्रोशीतील नागरीक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. रायतेवाडी ग्रामस्थांच्यावतीने तसेच दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने कै. शिवाजीराव मंडलीक यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# पत्रकाराला खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी

## लोणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

राहाता - श्रीरामपूर येथील एका पॉक्सो प्रकरणासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या वृत्तामुळे संतप्त झालेल्या व्यक्तीने पत्रकाराला फोन करून खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, प्रसाद गणेश घोगरे (वय ३४, रा. नेहरूनगर, लोणी खुर्द, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) यांनी लोणी पोलीस ठाण्यात लेखी फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, ११ जुलै २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे १२.१२ ते १२.१६ वाजण्याच्या दरम्यान त्यांच्या मोबाईलवरून एका व्यक्तीचा फोन आला. संबंधित व्यक्तीने स्वतःचे नाव मोहन आडागळे (रा. श्रीरामपूर) असे सांगितले.

फोनवर बोलताना संबंधिताने, तू आमच्याविरोधात पॉक्सो प्रकरणाची बातमी का प्रसिद्ध केली? ती बातमी आणि गुन्हा मागे घे, अन्यथा तुला खोट्या गुन्ह्यात अडकवीन, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

यावर प्रसाद घोगरे यांनी पत्रकार म्हणून वस्तुनिष्ठ वृत्तांकन करणे हे आपले कर्तव्य असल्याचे सांगितले. तसेच संबंधित गुन्हा नियमानुसार श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर संतप्त झालेल्या व्यक्तीने ट्रॉसिटी, बलात्कार तसेच स्वतःच्या मुलीच्या अपहरणाचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. शिवीगाळ करत तुला आणि तुझ्या कुटुंबाला जिवंत सोडणार नाही, जिथे दिसशील तिथे जीवे मारून टाकीन, अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या प्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा क्रमांक ०७१३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम ३५१(४) अंतर्गत नोंद करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करीत आहेत. या गुन्ह्यात महाराष्ट्र पत्रकार संरक्षण कायद्याने गुन्हा दाखल होणे संदर्भात फिर्यादी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना भेटणार आहे.

# प्रा. सुदाम शिंदे यांना पीएच. डी. पदवी प्रदान

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजुर ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे कार्यरत असलेले प्रा. सुदाम बाजीराव शिंदे यांना नुकतेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएचडी पदवी प्रदान करून गौरविले. त्यांनी अकोले तालुक्यातील शाश्वत पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास २०१० ते २०२० या विषयावर संशोधन केले.त्यांना प्राचार्य.मधुकर राजपंगे यांचे बहुमोल मार्गदर्शक मिळाले. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड.मनोहरराव देशमुख,सचिव श्री.एम.एल.मुठे,खजिनदार श्री.व्ही.आय.मदन आणि संचालक मंडळाने त्यांचे अभिनंदन केले.प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड.मनोहरराव देशमुख यांनी संशोधन प्रबंध तालुक्याच्या पर्यटन विकासाला पुरक ठरेल अशी भावना व्यक्त केली.



# ग्राहकांचा नवा सल्लागार
# कृत्रिम बुद्धीमत्ता



**उद्याच्या बाजारपेठेत तुमचा सर्वात मोठा स्पर्धक दुसरी कंपनी नसून, कृत्रिम बुद्धिमत्ता असू शकते.**

सकाळचे दहा वाजले होते. एका लघुउद्योगाच्या कार्यालयात विक्री विभागातील कर्मचारी नेहमीप्रमाणे ई-मेल तपासत होते. काही क्षणांतच उत्पादनाविषयी अनेक चौकशा आल्या. उत्पादनाची माहिती, तांत्रिक तपशील आणि किंमत मागविणाऱ्या या चौकशा पाहून कंपनीच्या संचालकांना आनंद झाला. दोन दिवसांत सर्वांना कोटेशन पाठवण्यात आले; पण त्यानंतर एकाही ग्राहकाने पुढे संपर्क साधला नाही.

यामागचे कारण वेगळे होते. या चौकशांमागे ग्राहकापेक्षा कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिक वाटा होता. आज AI च्या मदतीने काही सेकंदांत डझनभर कंपन्यांकडून माहिती मागवता येते. ई-मेल लिहिण्यापासून तुलना करण्यापर्यंत सर्व काम AI करते. त्यामुळे ग्राहकांच्या निर्णयप्रक्रियेत एक मोठा बदल घडत आहे.

पूर्वी एखादे उत्पादन खरेदी करण्यासाठी ग्राहक गुगलवर शोध घेत असे, विविध वेबसाइट्स पाहत असे, व्हिडिओ बघत असे आणि शेवटी विक्रेत्याशी संपर्क साधत असे. आज तो ChatGPT, Gemini, Claude किंवा Perplexity यांसारख्या AI सहाय्यकाला थेट विचारतो, "माझ्या व्यवसायासाठी सर्वोत्तम पॅकेजिंग उत्पादक कोणता?" काही क्षणांत त्याला विविध कंपन्यांची तुलना, त्यांचे फायदे-तोटे आणि शिफारसी मिळतात. म्हणजेच ग्राहक तुमच्याशी बोलण्यापूर्वीच AI त्याच्यासाठी तुमच्याबद्दल मत तयार करत असते.

यामुळे व्यवसायातील स्पर्धेचे स्वरूप बदलत आहे. आजही उत्पादनाची गुणवत्ता, योग्य किंमत आणि वेळेवर सेवा महत्त्वाची आहे; पण ती एकटी पुरेशी राहिलेली नाही. कारण ग्राहकापर्यंत पोहोचण्यापूर्वी तुमच्या व्यवसायाची पहिली ओळख आता एखादा विक्रेता नव्हे, तर कृत्रिम बुद्धिमत्ता करून देत आहे.

समजा एखादा ग्राहक AI ला विचारतो, "नाशिक परिसरातील उत्कृष्ट फूड पॅकेजिंग उत्पादक कोण?" तुमची कंपनी अनेक वर्षांपासून उत्तम काम करत असली, तरी तिची डिजिटल माहिती अपुरी असेल, तर AI तुमचे नाव सुचवणार नाही. दुसरीकडे, नवीन कंपनीने आपल्या वेबसाइटवर, उत्पादनांच्या माहितीत आणि डिजिटल उपस्थितीत सातत्य ठेवले असेल, तर ग्राहक प्रथम तिच्याशी संपर्क साधेल. म्हणजे स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच तुम्ही एक संधी गमावलेली असेल.

आजचा उद्योग केवळ कारखान्यात घडत नाही; तो इंटरनेटवरही घडतो. AI इंटरनेटवरील विश्वासार्ह माहितीच्या आधारे उत्तर देते. त्यामुळे वेबसाइट, उत्पादनांची माहिती, प्रमाणपत्रे, ग्राहकांचे अभिप्राय आणि उद्योगाविषयीचे लेख यांचे महत्त्व पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहे. आता स्पर्धा केवळ गुगलमध्ये वर येण्याची नाही, तर AI च्या उत्तरांमध्ये स्थान मिळवण्याची आहे.AI ला आकर्षक जाहिरातींपेक्षा वस्तुनिष्ठ माहिती अधिक महत्त्वाची वाटते. कंपनी किती वर्षांपासून कार्यरत आहे, कोणत्या उद्योगांना सेवा देते, उत्पादन क्षमता किती आहे, कोणती गुणवत्ता प्रमाणपत्रे आहेत आणि ग्राहकांचा अनुभव काय आहे, या गोष्टी तिच्यासाठी निर्णायक असतात. म्हणूनच प्रत्येक उद्योगपतीने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे—माझ्या व्यवसायाबद्दल इंटरनेटवर उपलब्ध असलेली माहिती AI ला माझी खरी ओळख करून देण्यासाठी पुरेशी आहे का?

आज अनेक लघुउद्योग कोट्यवधी रुपयांची यंत्रसामग्री उभी करतात; पण त्यांची वेबसाइट अनेक वर्षे अद्ययावत होत नाही. उत्पादनांची माहिती अपुरी असते, छायाचित्रे दर्जेदार नसतात आणि कंपनीची खरी क्षमता इंटरनेटवर दिसत नाही. परिणामी AI कडेही त्या उद्योगाबद्दल पुरेशी माहिती उपलब्ध होत नाही.

याउलट काही उद्योग सातत्याने आपली डिजिटल उपस्थिती मजबूत करत आहेत. ते उत्पादनांबद्दल माहितीपूर्ण लेख लिहितात, ग्राहकांच्या समस्यांवर उपाय सुचवतात, नवीन तंत्रज्ञानाची माहिती शेअर करतात आणि नियमितपणे माहिती अद्ययावत ठेवतात. अशा उद्योगांची विश्वासार्हता AI च्या दृष्टीने वाढते आणि त्यांना अधिक व्यावसायिक संधी मिळतात.

ग्राहकांच्या अपेक्षाही बदलल्या आहेत. आज ग्राहक केवळ किंमत विचारत नाही; तो योग्य उपाय शोधत असतो. कमी खर्च, अधिक टिकाऊपणा, पर्यावरणपूरकता आणि विश्वासार्हता यांचा तो विचार करतो. त्यामुळे केवळ उत्पादन विकणाऱ्या उद्योगांपेक्षा ग्राहकाच्या समस्येचे समाधान करणारे उद्योग अधिक यशस्वी ठरतील.

याचा अर्थ विक्रीची पारंपरिक पद्धतही बदलावी लागेल. प्रत्येक चौकशीला लगेच दर पाठवण्यापेक्षा ग्राहकाची गरज समजून घेणे आणि योग्य मार्गदर्शन करणे अधिक महत्त्वाचे ठरेल. AI माहिती देऊ शकते; पण विश्वास निर्माण करणे, अनुभवाच्या आधारे योग्य सल्ला देणे आणि दीर्घकालीन नाते तयार करणे हे काम अजूनही माणूसच करू शकतो.

म्हणूनच कृत्रिम बुद्धिमत्ता ही उद्योगांसाठी संकट नाही; ती एक नवी संधी आहे. भारतातील लाखो लघुउद्योग उत्कृष्ट उत्पादने तयार करतात; पण त्यांची माहिती जगापर्यंत पोहोचत नाही. AI मुळे ही दरी भरून काढण्याची संधी उपलब्ध झाली आहे. छोट्या शहरातील उद्योगानेही योग्य डिजिटल उपस्थिती निर्माण केली, तर देश-विदेशातील ग्राहक त्याच्यापर्यंत सहज पोहोचू शकतात.

भविष्यात व्यवसायाची प्रतिष्ठा केवळ बाजारातच नव्हे, तर AI च्या नजरेतही ठरणार आहे. अनेक ग्राहक तुमच्या वेबसाइटवर येण्यापूर्वी AI चे उत्तर वाचतील. त्यामुळे "AI Reputation" हा प्रत्येक उद्योगासाठी महत्त्वाचा विषय ठरणार आहे.

तंत्रज्ञानाच्या प्रत्येक क्रांतीने नवीन आव्हाने आणि नवीन संधी दिल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेची क्रांतीही त्याला अपवाद नाही. या युगात यश त्यांनाच मिळेल, जे AI ला प्रतिस्पर्धी नव्हे, तर सहकारी मानतील; माहितीला संपत्ती समजतील; डिजिटल विश्वासार्हतेला प्राधान्य देतील आणि ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षांनुसार स्वतःला सतत विकसित करतील. भविष्यातील बाजारपेठ ही केवळ उत्पादनांची स्पर्धा नसेल; ती विश्वास, ज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसोबत चालण्याच्या क्षमतेची स्पर्धा असेल.

**- आनंद किसन हासे** (एम.ई. कॉम्प्युटर)

लेखकाने संगणक अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलेले असून प्रथितयश उद्योजक आहेत.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी क्लॉथ सेंटर सिल्क ॲण्ड साडीज
मनासारखी खरेदी आणि भरपूर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# देशातील अव्वल ५० युवा उद्योग वारसांमध्ये जय मालपाणी

## 'हुरुन इंडिया टॉप ५० एक्सेप्शनल सक्सेसर्स २०२६' मध्ये मानाचे स्थान

**संगमनेर (युवावार्ता) प्रतिनिधी -** संगमनेरच्या औद्योगिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी कामगिरी मालपाणी समूहाने नोंदवली आहे. देशातील उद्योगविश्व, कौटुंबिक व्यवसाय आणि उद्योजकीय नेतृत्वाचा अभ्यास करणाऱ्या प्रतिष्ठित Hurun India आणि ASK Private Wealth यांनी जाहीर केलेल्या 'Top 50 Exceptional Successors 2026' या राष्ट्रीय यादीमध्ये मालपाणी समूहाचे युवा उद्योगपती श्री. जय मालपाणी यांची निवड झाली आहे. पुढील पिढीतील प्रभावी उद्योग नेतृत्व, दूरदृष्टी आणि कौटुंबिक उद्योगाला आधुनिकतेची जोड देणाऱ्या उत्तराधिकाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश झाल्याने संगमनेरसह महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रात आनंद व्यक्त होत आहे. जय मालपाणी हे उद्योजक मनिष मालपाणी आणि संगमनेर नगरपरिषदेच्या नगरसेविका रचना मालपाणी यांचे सुपूत्र आहेत. ओंकारनाथ मालपाणी, माधवलाल मालपाणी, उद्योजक राजेश मालपाणी, संजय मालपाणी, मनिष मालपाणी, गिरीश मालपाणी, आशिष मालपाणी यांच्या पावलावर पाऊल ठेवत जय मालपाणी, मालपाणी उद्योग समूहाची धुरा चांगल्या प्रकारे सांभाळत आहेत.

हा सन्मान भारतातील अशा युवा उद्योग वारसांना दिला जातो, जे आपल्या कौटुंबिक उद्योगाचा वारसा पुढे नेताना आधुनिक व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, व्यवसाय विस्तार, नवकल्पना आणि दीर्घकालीन मूल्यनिर्मितीमध्ये उल्लेखनीय योगदान देत आहेत. केवळ कौटुंबिक वारसा मिळाल्यामुळे नव्हे, तर उद्योगाला नवीन उंचीवर नेण्याची क्षमता, नेतृत्वगुण, व्यावसायिक दृष्टीकोन आणि भविष्यातील वाढीची दिशा या निकषांवर या यादीसाठी निवड केली जाते.

जय मालपाणी हे महाराष्ट्रातील प्रतिष्ठित मालपाणी समूहाच्या नव्या पिढीतील उद्योग नेतृत्वाचे प्रतिनिधित्व करतात. मालपाणी समूहाने गेल्या अनेक दशकांत रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी, मनोरंजन, अक्षय ऊर्जा, ग्राहक उत्पादने आणि विविध व्यवसाय क्षेत्रांमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. बदलत्या काळानुसार व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञान, व्यावसायिक व्यवस्थापन आणि विस्ताराची भूमिका स्वीकारत समूहाने सातत्याने प्रगती केली आहे. या परिवर्तनशील प्रवासात जय मालपाणी यांचे नेतृत्व महत्त्वाचे मानले जात आहे.

८ जुलै २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित ASK Private Wealth - Hurun India Future Forum Awards 2026 या प्रतिष्ठित कार्यक्रमात या यादीची घोषणा करण्यात आली. देशभरातील विविध उद्योग क्षेत्रांतील पुढील पिढीतील उद्योग नेत्यांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. उद्योगविश्वातील बदलते नेतृत्व, कौटुंबिक व्यवसायांचे आधुनिक रूपांतर आणि जागतिक स्पर्धेला सामोरे जाण्याची क्षमता असलेल्या युवा उत्तराधिकाऱ्यांचा सन्मान हा या पुरस्कारामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. या यादीमध्ये देशातील अनेक नामांकित उद्योग घराण्यांच्या पुढील पिढीतील नेत्यांचाही समावेश आहे. त्यामध्ये अलेक्झांडर जॉर्ज मुथूट (The Muthoot Group), अभ्युदय जिंदाल (Jindal Stainless), आदित्य ए. श्रीराम (DCM Shriram), अक्षित दिविज गुप्ता (KEI Industries), अलिशा मूपेन (Aster DM Healthcare) यांसारख्या युवा उद्योग नेत्यांची निवड झाली आहे. या प्रतिष्ठित नावांमध्ये जय मालपाणी यांचा समावेश होणे ही मालपाणी समूहासाठी आणि संगमनेरसाठी मोठी उपलब्धी मानली जात आहे.

उद्योग क्षेत्रातील जाणकारांच्या मते, कौटुंबिक उद्योगाला पुढे नेणे ही केवळ वारसा जपण्याची जबाबदारी नसून, बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेनुसार त्याचे आधुनिकीकरण, विस्तार आणि स्पर्धात्मकता टिकवून ठेवणे हे अधिक मोठे आव्हान असते. अशा परिस्थितीत Hurun India सारख्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या संस्थेकडून मिळालेली ही मान्यता भविष्यातील नेतृत्वाची अधिकृत दखल मानली जाते. संगमनेर शहराच्या औद्योगिक विकासामध्ये मालपाणी समूहाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. रोजगारनिर्मिती, उद्योगविस्तार, सामाजिक बांधिलकी आणि विविध विकासात्मक उपक्रमांमुळे समूहाने स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. आता जय मालपाणी यांच्या राष्ट्रीय स्तरावरील या गौरवामुळे संगमनेरच्या उद्योगविश्वाला देशपातळीवर नवी ओळख मिळाल्याची भावना उद्योग क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

उद्योग क्षेत्रातील अनेक मान्यवर, व्यावसायिक संस्था आणि सामाजिक संघटनांनी जय मालपाणी यांचे अभिनंदन करत, हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून संगमनेरच्या उद्योजकीय परंपरेचाही गौरव असल्याचे मत व्यक्त केले आहे.

### संगमनेरच्या उद्योगविश्वासाठी अभिमानाचा क्षण



# पोलीस भरतीचे वार्षिक वेळापत्रक जाहीर करा

## आ. सत्यजीत तांबेंची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षार्थी आणि पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या युवक-युवतींसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणारी मागणी महाराष्ट्र विधानपरिषदेत आमदार सत्यजीत तांबे यांनी मांडली. म.वि.प. नियम ९३ अंतर्गत सूचना क्रमांक २६ द्वारे त्यांनी राज्यातील पोलीस भरती तसेच इतर सरळसेवा पदभरतीसाठी वार्षिक वेळापत्रक जाहीर करण्याबरोबरच प्रलंबित भरती प्रक्रिया विनाविलंब पूर्ण करण्याची मागणी केली.

सभागृहात बोलताना आमदार तांबे यांनी सांगितले की, राज्यातील लाखो युवक-युवती, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थी, अनेक वर्षांपासून स्पर्धा परीक्षा आणि पोलीस भरतीची तयारी करत आहेत. अभ्यासिका, मैदाने आणि प्रशिक्षण केंद्रांमध्ये दिवसरात्र मेहनत घेऊनही भरती प्रक्रियेचे निश्चित वेळापत्रक नसल्याने विद्यार्थ्यांचे नियोजन विस्कळीत होत असून त्यांच्यात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होत आहे.

यूपीएससी, एमपीएससी, रेल्वे तसेच तामिळनाडू आणि केरळ राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही पोलीस भरतीचे वार्षिक कॅलेंडर जाहीर करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. वर्षाच्या सुरुवातीलाच विविध भरती प्रक्रिया आणि परीक्षांचे वेळापत्रक उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येईल, असे त्यांनी नमूद केले. यावर उत्तर देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी या मागणीची दखल घेतली. एमपीएससीच्या धर्तीवर पोलीस भरती प्रक्रियेसाठी वार्षिक वेळापत्रक तयार करण्याबाबत मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा झाल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली. सदस्यांच्या सूचनेनुसार सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल तसेच पोलीस भरतीचे वार्षिक वेळापत्रक तयार करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

सरकारच्या या सकारात्मक भूमिकेमुळे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असून भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, नियोजनबद्ध आणि वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आमदार सत्यजीत तांबे यांनी व्यक्त केली.

# कसारा घाटात सुरक्षेचा प्रश्न

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका शहापूर तालुक्यातील जुन्या कसारा घाटाला बसला आहे. सततच्या पावसामुळे रस्त्याखालचा भराव वाहून गेल्याने संरक्षण भिंत कोसळली असून महामार्गाच्या काही भागाला भेगा पडल्याचे समोर आले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने या मार्गावरील वाहतूक एकेरी केली आहे. जुन्या कसारा घाटातील रस्त्याखालील माती पावसाच्या पाण्यामुळे वाहून गेल्याने रस्त्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे घाटातील संरक्षक भिंतीचा काही भाग कोसळला असून महामार्गावर तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
• 24x7 Technician
• One Time Blood Tubing Use
• Modern Dialysis Centre
• Nephrologist, AVF Surgery
• Renal Dialysis
• Dialysis Catheter Insertion
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ज्ञ)
MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
७०३८२७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू । कांजीवरम । सिल्क पैठणी । बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ॲपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25